


REGISTERED No. B. 343

# अर्थ

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख ९ मार्च, १९४९ अंक १०

★ ग्रेटर पूना स्कीममधील ★

* वाढत्या पुण्याचें वाढतें वैभव ! * सरकारी मंजुरीनें पास झालेली.

## डहाणूकर कॉलनी

मिलिटरी ॲकॅडेमीच्या वाटेवर, नाथीबाई ठाकरसी कॉलेजपासून
अवघ्या एक मैल अंतरावर, कोथरूड गांवास लागून

★ हवेशीर व आरोग्यदायक ठिकाणीं ★

## २०५ प्लॉटस् विकणें आहेत.

★ खरेदीखतापूर्वी लेव्हलिंग, पक्के रस्ते, पाणी व वीज या सोयी करून देण्याची हमी.

★ वरील प्रकारचीं डेव्हलपमेंटचीं कामें सुरू झालीं.

★ शाळा–क्रीडांगण–बगीचा–ओपन स्पेसिस वगैरेकारितां जागा राखून ठेवण्यांत आल्या आहेत.

★ डेव्हलप्ड प्लॉटच्या किंमती प्रत्येकीं रु. ३२०० ते रु. ४०००.

★ प्लॉटस् दाखविण्याची वेळ दररोज सकाळीं ९ ते १० ★

★ भेटा अगर लिहा ★

मॅनेजर,
मॉडर्न कन्स्ट्रक्शन ॲंड डेव्हलपमेंट कंपनी,
डहाणूकरांचा बंगला, प्रभात. क्रॉसरोड,
पुणें ४.

म. य. दातार,
ऑर्गनायझर, डहाणूकर कॉलनी,
" दयानिवास ".
कचरेवाडीचे अलीकडे, कर्वे रोड नजीक, पुणें ४.

## दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड

हेड ऑफिसः—लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.

★ धंद्याच्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे.

आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर.

—महाराष्ट्रांतील—
प्रगमनशील व अग्रेसर विमा संस्था

## दि औंध म्युच्युअल इन्शूरन्स सोसायटी लि. पुणें २

—आमचीं वैशिष्ट्यें—

( १ ) काटकसरीचा कारभार ( २ ) खर्चाचें अल्प प्रमाण ( ३ ) क्लेम्स तावडतोब पटविणें ( ४ ) एजंटास कायमचें व वंशपरंपरागत कमिशन ( ५ ) माफक हप्त्याचे दर.

विमा अथवा एजन्सी यासाठी लिहा अगर भेटा.

—मॅनेजिंग डायरेक्टर

## सर्व प्रसिद्ध माल

छोट्या-मोठ्या कारखान्यांना लागणारीं पेडेस्टिअल्स, व्हाइसेस क्रॅंक शेगडे, वारा निर्माण करणारे लहान-मोठे ब्लोअर्स अगर भाते. हे भाते सोनारांनाहि नेहमीं लागतात.

| केळकर बंधु, बुधवार चौक, पुणें १ | केळकर बंधु, (शाखा) मेनरोड, नाशिक. |
|---|---|

(आमचेकडे निरनिराळ्या एजन्सीज घेतल्या जातात व आमच्या सुमारें १०० वर उपविक्रेत्यांमार्फत मालाचा प्रसार केला जातो.)


## विविध माहिती

**फिलिपाइन्समधें हिंदी लाकूड तज्ज्ञाला आमंत्रण**—इमारती लाकडाचे हिंदी तज्ज्ञ डॉ. कामेसम् हे फिलिपाइन्स बेटांतील लाकूड-व्यापारी-संघाच्या बोलवण्यावरून, संघाला सल्ला देण्यासाठीं तिकडे जाणार आहेत असें समजतें. इमारतींत आणि बांधकामांत विशिष्ट रासायनिक पद्धतीनें संस्कारित असें लाकूड कितपत वापरतां येईल ह्यासंबंधीं ते फिलिपाइन्सच्या सरकारलाहि सल्ला देणार आहेत. लाकूड टिकविणारा आणि त्याचा एंजिनिअरिंगसाठीं उपयोग करणारा असे दोन कारखानेहि डॉ. कामेसम् हे तेथें उभारणार आहेत.

**रशिआशीं युद्ध झालें तर**—ब्रिटिश कम्युनिस्ट पक्षाचे पुढारी मि. हॅरी पॉलिट ह्यांनीं असें जाहीर केलें आहे कीं, रशिआशीं इंग्लंडचें युद्ध झाल्यास ब्रिटिश कम्युनिस्ट पक्ष संप आणि प्रत्यक्ष कृतिमंडळें स्थापन करून युद्धास विरोध करील. ह्याच आशयाचीं विधानें फ्रेंच कम्युनिस्ट पुढारी थोरेझ आणि इटालिअन कम्युनिस्ट पुढारी तॉग्लि अॅटी ह्यांनींहि नुकतीच केलीं आहेत. युरोपांतील सध्याच्या वातावरणांत ह्या विधानांमुळें खळबळ उडून गेली आहे.

**आऱ्हें येथील दूध-उत्पादन केंद्र**—आऱ्हें येथें मुंबई सरकारनें २ कोटी रुपये खर्चून एक आधुनिक दुग्धालय स्थापन करण्याचें ठरविलें आहे. मुंबईपासून १३ मैल उत्तरेला होणाऱ्या ह्या वसाहतीचा उद्घाटन समारंभ बाबू राजेंद्रप्रसाद ता. १३ मार्च रोजीं करणार आहेत. दुग्धालयाचें आधुनिक यंत्रसाहित्य येत्या जून अगर जुलैमध्यें उभारण्यांत येईल असें वाटतें.

**हिंदुस्थानची लोकसंख्या**—हिंदी पार्लमेंटमध्यें अन्नमंत्री श्री. जयरामदास दौलतराम ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं १९४७-४८ सालांत हिंदुस्थानची लोकसंख्या ३४,७०,०२,००० इतकी असावी. त्यापैकीं वयांत आलेल्यांची संख्या सुमारें २९,८४,२२,००० होती. देशांत अन्नधान्याचें उत्पादन ४,१७,०५,००० टन इतकें होतें. अन्नधान्याची गरज मात्र ४,५१,०३,००० टन इतकी आहे. म्हणजे ३३,९८,००० टन अन्नधान्याचा तुटवडा भासत आहे.

**आर्थिक विकासासाठीं परकीय भांडवल**—फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या संस्थेची २२ वी वार्षिक सभा दिल्लीला नुकतीच झाली. फेडरेशनचे अध्यक्ष ह्यांनीं आपल्या भाषणांत असे उद्गार काढले कीं, परकीय भांडवलाची मदत घेणें म्हणजे आर्थिक दास्य पत्करणें होय, अशी समजूत प्रचलित आहे. तथापि सरकारनें अगर खाजगी व्यक्तींनीं परदेशांशीं आर्थिक सहकार्य करून सुद्धां राजकीय दृष्ट्या परतंत्र नसलेल्या देशांना अशा सहकार्याचा फायदा घेता येईल.

**तांदुळाच्या टंचाईची तीव्रता**—संयुक्त राष्ट्रसंघाच्या अन्न व शेती संघटनेनें आशिआंतील लोकांचे पुढें उभ्या असलेल्या तांदुळाच्या टंचाईकडे एका पत्रकद्वारें लक्ष वेधलें आहे. १९४८-४९ मधील तांदुळाचें जागतिक उत्पादन १४·५ कोटी टन आहे. ह्याच्या मागील वर्षापेक्षा हें उत्पादन २४ लाख टनांनीं जास्त असलें तरी युद्धपूर्व काळांतील सरासरी उत्पादनापेक्षां हें उत्पादन २९ लाख टनांनीं कमी आहे. १९३९ ते ४८ च्या दरम्यान लोकसंख्या १० कोटींनीं वाढली आहे. त्यामुळें युद्धपूर्व कालापेक्षां तांदुळाची सरासरी गरज १० टक्क्यांनीं वाढलेलीच आहे. तांदुळ उत्पन्न करणाऱ्या देशांनीं भाताच्या लागवडीचें क्षेत्र वाढविलें असलें तरी तांदुळाचा पुरवठा अद्याप अपुराच आहे.

**नोटांच्या आयात-निर्यातीवर निर्बंध**—हिंदुस्थान सरकारनें एक पत्रक काढून हिंद सरकारच्या एक रुपयाच्या नोटा पाकिस्तानांतून हिंदुस्थानांत आणण्यास मनाई केली आहे. त्याचप्रमाणें रिझर्व्ह बँकेनें एक हुकूम काढून हिंद सरकारच्या नोटा पाकिस्तानांत नेण्याला बंदी केली आहे. ही बंदी रिझर्व्ह बँकेच्या नोटांनाही लागू आहे. हिंद सरकारच्या पाकिस्तानांत चालू असलेल्या एक रुपयाच्या नोटांची जबाबदारी आतां त्या सरकारवर आहे. ३० सप्टेंबर, १९४८ पासून हिंद सरकारच्या व रिझर्व्ह बँकेच्या नोटा पाकिस्तानांत चलन म्हणून रद्द झालेल्या आहेत. वरील परिस्थितीस अनलक्षून हे दोन हुकूम काढण्यांत आले आहेत.


## NOTICE

**THE BHOR STATE BANK LIMITED, BHOR.**

Notice is hereby given that the Fifth Ordinary General Meeting of the Share-holders of the Bhor State Bank Ltd., will be held at Poona in Poona Branch Office at 515 Budhwar Peth on Sunday the 27th March 1949 at 4 p. m. (S. T.) to transact the following business:—

1. To receive and consider the Balance Sheet, Profit and Loss Account and the report of the Directors and Auditors for the year ended 31st December, 1948.
2. To declare a dividend.
3. To elect Directors in place of retiring Directors, who are eligible for re-election.
4. To appoint Auditors and to fix their remuneration.
5. To transact such other business as may be allowed by the Chairman.

Shirval,
20th February, 1949.

By order of the Board,
**R. G. Agashe.**
MANAGER.

*N. B.* The Share Transfer Books of the Bank will be closed from the 17th March 1949 to 4th April 1949 (both days inclusive).

Dividend when delcared will be made payable on Tuesday the 2nd May 1949. The Dividend Warrants will be posted to the Share-holders on their addresses registered with the Bank. Any change may please be communicated.

# अर्थ

बुधवार, ता. ९ मार्च १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

## हिंदी कपाशीचा नियंत्रित दरानें पुरवठा

हिंदी कपाशीवरील नियंत्रण व कपाशीच्या ठरवून दिलेल्या किंमती प्रत्यक्ष चालू परिस्थितीस धरून नाहींत; तेव्हां सरकारनें नियंत्रण काढून टाकावें किंवा निदान किंमतींचा फेरविचार हित-संबंधी लोकांचा सल्ला घेऊन करावा, अशी सूचना इंडियन मर्चंट्स चेंबरनें सरकारास केली आहे. १९४८ च्या सप्टेंबरच्या सुमारास सरकारनें कापडाबरोबर कपाशीवरहि नियंत्रण बसविलें आणि तिच्या कमाल किंमती खालीलप्रमाणें ठरवून दिल्याः—

| कपाशीची प्रमाण धरलेली जात | ७८४ पौंडांच्या प्रत्येक खंडीची कमाल किंमत |
| --- | --- |
| फाइन जरिला ¾″ | ६०० रु. |
| फाइन जरिला २५/३२″ | ६२० रु. |

ही कमाल किंमत वाढविण्यांत आली तरी जरिलाखेरीज इतर कपाशीच्या किंमतींतील फरक पूर्वींच्या कंट्रोल काळाप्रमाणेंच राखण्यांत आले. त्या बाबतींत व्यापारी वर्गाचा किंवा तज्ज्ञांचा सल्ला घेण्यांत आला नाहीं. हिंदमधील कपाशीच्या एकूण पिकापैकी ⅓ पेक्षा कमी पीक प्रमाणभूत जरिला कपाशीचें आहे; ⅔ पीक बाकीच्या जातींचें आहे. जरिलापैकीहि बरीच कपास १३/१६″ व २७/३२″ पर्यंतच्या धाग्याची आहे; म्हणजे प्रमाण-भूत धरलेल्या लांबीच्या धाग्याची नाहीं. ह्यावरून, कपाशीच्या पिकापैकी कितीतरी मोठ्या भागाची नियंत्रित किंमत वस्तुस्थितीस धरून नाहीं.

### नियंत्रण अयशस्वी

सरकारचें कपाशीच्या किंमतींचें नियंत्रण १९४८–४९ च्या मोसमांत अयशस्वी ठरलें आहे, ह्याची कारणमीमांसा इं. सें. कॉटन कमिटीचे उपाध्यक्ष श्री. आर. जी. सरय्या, ह्यांनीं ह्या प्रश्नावरील आपल्या एका अभ्यासपूर्ण लेखांत तज्ज्ञपणें केली आहे. कपाशीच्या वेगवेगळ्या जातींस किंमत ठरवून देतांना देशाच्या फाळणीनंतरच्या आणि हिंदी कपाशीच्या पुरवठा–मागणीच्या परिस्थितीचा विचार झाला नाहीं, हें त्यांनीं आकडेवार माहिती देऊन दाखवून दिलें आहे. चालू वर्षीचें पीक पूर्वीच्या अंदाजापेक्षा (२९ ते ३० लक्ष गांठी) सुमारें ७ लक्ष गाठींनीं कमी पडणार आहे. त्यामुळें जरिलाच्या कमाल किंमतीस तिच्या किंमती जाऊन भिडल्या आहेत, एवढेंच नव्हे तर ठराविक किंमतींच्या पलीकडे सर्वच प्रकारच्या कपाशीची किंमत गेली आहे. सरकारी नियंत्र-णापेक्षा आर्थिक पाश अधिक प्रभावी ठरले आहेत आणि नियंत्रित बाजारांस अर्थच उरलेला नाहीं. चांगल्या कपाशीस योग्य भाव मिळत नाहीं, म्हणून चांगल्या-वाईट कपाशीचें मिश्रण करण्याच्या प्रवृत्तीस अनिष्ट उत्तेजन मिळालें आहे. पाकिस्तानी कपाशीस दर खंडीस २०० ते ४०० रु. जास्त देण्यापेक्षा वरच्या दर्जाच्या हिंदी कपाशीची किंमत सरकारनें वाढवून देणें हिताचें होणार नाहीं काय ? असा प्रश्न श्री. सरय्या ह्यांनीं विचारला आहे. हिंदी गिरण्यांस लागणाऱ्या कपाशीपैकी फक्त ५० ते ६०% कपास हिंदी असते; बाकीची परदेशांतून आणावी लागते; तेव्हां जागतिक किंमतीपेक्षा हिंदी किंमती कमी राखणें अशक्यप्राय आहे, असें इं. म. चेंबरचें म्हणणें आहे. परदेशी कपास हिंदी कपाशीइतकी स्वस्त करण्यासाठी गिरण्यांना सबसिडी देणें किंवा हिंदी कपाशीची खरेदी नियंत्रित दरापेक्षा भारी दरानें चालली तरी त्याकडे दुर्लक्ष करणें, ह्या दोन गोष्टी येथें संभवतात आणि त्या दोन्हीहि अयोग्य अशाच आहेत.

### उपाययोजना

हिंदी कपाशीचें पीक वाढविण्याच्या प्रश्नाकडे अगत्यानें लक्ष पुरविणें आतां आवश्यक झालें आहे. युद्ध-काळांत कपाशीखालील क्षेत्र बुद्धिपुरस्सर कमी करण्यांत आलें, गिरण्यांत कपाशीचा उठाव हळूहळू वाढत आहे आणि युद्ध-समाप्तीनंतर कपाशीची निर्गत मोठ्या प्रमाणावर होऊं दिली, ह्या सर्व कारणांमुळें कपाशीचा सालोसाल उरणारा साठा कमी कमी होत चालला आहे. पाकि-स्तानांतील कपाशीचें पीक आपल्या अधिकारक्षेत्राचे बाहेर गेल्या-मुळें, मामुली काळांत आपणांस ४५ ते ५० लक्ष गाठी उपलब्ध असावयाच्या, त्या आतां २७ ते ३० लक्ष गाठींवर आल्या आहेत. पाकिस्ताननें स्वतःच्या कपाशीवर नियंत्रण बसविण्याचें नाकार-ल्यामुळें हिंदी कपाशीच्या पुरवठ्याची परिस्थिति अधिकच बिघ-डली आहे. परदेशी कपास घेण्याकडे आपल्या उपलब्ध हुंडणा-वळीचा विनियोग करणें राष्ट्रीय हिताचें होणार नाहीं व चांगल्या जातीच्या कपाशीचें देशांतील उत्पादन वाढवूनच दीर्घकालीन प्रश्न सोडविला पाहिजे, हें उघड आहे. अन्नधान्यास सरकारनें प्राधान्य दिल्यानें कपाशीची लागवड कमी झाली, परंतु धान्याची लागवड तरी कोठें वाढली आहे ? ह्या दोन्हींच्या स्पर्धेंतहि दोन्हींची वाढ घडवून आणण्याचें बिकट काम पार पाडावयाचें आहे. हिंदी कपाशीची आजची किंमत शेतकऱ्यास परवडते का नाहीं, मध्यस्त दलालीचें प्रमाण गैरवाजवी आहे काय, इत्यादि प्रश्नांचा विचार करून हिंदी कपाशीच्या नियंत्रित किंमतीचा प्रश्न सोडवावा लागेल हें उघड आहे. “ कपाशीवरील कंट्रोल हा साधारणपणें यशस्वी झाला आहे; सध्या दिसत असलेला तुटवडा कमी किंमतीमुळें निर्माण झालेला नसून तो मनुष्याच्या आवाक्याबाहेरील कारणांनीं उत्पन्न झाला आहे” अशी कारणमीमांसा हिंदुस्थान सरकारचे कपास नियंत्रण अधिकारी, श्री. टी. बी. दलाल ह्यांनीं केली आहे; परंतु तेवढ्यानें समाधान मानतां येणें अशक्य आहे. •

---

**मध्यभारतांतील शेती**—मध्यभारत सरकारनें पडीक जमीन यांत्रिक नांगरानें नांगरून लागवडीस आणण्यासाठी १८ लाख रुपयांची योजना मंजूर केली आहे. एका वर्षांत १० हजार एकर पडीक जमीन लागवडीस आणली जाईल अशी अपेक्षा आहे. त्यासाठी ९ लाख रुपये खर्च करावे लागतील. मध्यभारतांत बरीच सुपीक जमीन पडून असल्यानें ती लागवडीखालीं आणल्यास अन्नधान्याच्या उत्पादनांत चांगली वाढ होईल.

## डॉ. मथाई यांचें अंदाजपत्रक व देशांतील चलनवृद्धि

प्रो. नी. वि. सोवनी.
(गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड एकॉनॉमिक्स, पुणें.)

नीरक्षीरविवेक हंसालस्यं त्वमेव तनुषे चेत् । †
विश्वास्मिन्नधुनान्यः कुलव्रतं पालयिष्यति कः ॥

सोमवार, ता. २८ रोजीं अर्थमंत्री डॉ. जॉन मथाई यांनीं पुढील वर्षाचें अंदाजपत्रक हिंदी विधिमंडळास सादर केलें. डॉ. मथाई हे स्वतः नावाजलेले अर्थशास्त्रज्ञ आहेत व कांहीं वर्षांपूर्वी हिंदी अर्थशास्त्रज्ञांच्या परिषदेचें अध्यक्षस्थानही त्यांनीं मंडित केलें होतें. गेल्या वर्षी देशांतील चलनवृद्धीची परिस्थिति प्रमाणाबाहेर भडकली आणि त्याच सुमारास डॉ. मथाई यांच्याकडे अर्थमंत्र्याचें काम सोंपविण्यांत आलें. ते देशांतील चलनवृद्धीवर यशस्वी उपाययोजना करतील, अशी सर्वांची विशेषतः डॉ. मथाई यांस आपल्यापैकीं मानणाऱ्या हिंदी अर्थशास्त्रज्ञांची अपेक्षा होती. गेल्या वर्षी चलनवृद्धि काबूत आणण्याच्या दृष्टीनें हिंदुस्थान सरकारनें केलेले प्रयत्न जरी थातुरमातुर स्वरूपाचे होते, तरी आपल्या पहिल्या व नवीन अंदाजपत्रकांत डॉ. मथाई हे त्या दिशेनें अधिक जोमदार व कार्यदक्ष धोरणाचा उपक्रम करतील अशी अपेक्षा होती. डॉ. मथाई यांच्या परवाच्या अंदाजपत्रकाचें परीक्षण केल्यास या अपेक्षा सर्वस्वीं धुळीस मिळाल्या आहेत आणि पूर्वीच्या अर्थमंत्र्यांनीं केलेल्या घोडचुकाच डॉ. मथाई यांनींही आपल्या अंदाजपत्रकांत केल्या आहेत असें दिसून येईल. अर्थातच, देशांतील चलनवृद्धि रोखण्याच्या दृष्टीनें या अंदाजपत्रकानें पुच्छप्रगतीच केली आहे हें निराळें सांगावयास नको.

### दडलेली मोठी तूट

डॉ. मथाई यांच्या अंदाजपत्रकासंबंधीं सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांत फार मोठी तूट दडलेली आहे आणि सरकारच्या जमाखर्चाची तोंडमिळवणी झालेली नाहीं. युद्धोत्तर कालांत अंदाजपत्रकाची मांडणी बदललेली असल्यामुळें या काळांतील अंदाजपत्रकांतील तूट सामान्यतः एकदम लक्षांत येत नाहीं व त्यामुळें अंदाजपत्रक समतोल आहे असें सकृत्दर्शनीं दिसतें. तथापि वस्तुस्थिति याच्या अगदीं उलट आहे. तिचें नीट आकलन होण्यासाठीं वर उल्लेखिलेल्या अंदाजपत्रकाच्या नवीन मांडणीचें थोडें विवेचन केलें पाहिजे.

१९४६–४७ च्या अंदाजपत्रकांत सर आर्चिबाल्ड रोलंड यांनीं ही नवीन मांडणीची पद्धति अंगिकारली. या नवीन पद्धतींत सर्व जमाखर्चाचें एकच अंदाजपत्रक न करतां तें करांच्या जमाखर्चाचे व भांडवली जमाखर्चाचे निराळें दाखविण्यांत येऊं लागलें. पूर्वीच्या अंदाजपत्रकांतील जमाखर्चाच्या निरनिराळ्या बाबींचे दुलग वर्गीकरण करून ही सुधारणा करण्यांत आली. या नवीन पद्धतीचें विवेचन त्यावेळच्या अंदाजपत्रकाबरोबर नेहमीं प्रसिद्धिल्या जाणाऱ्या विवेचनाच्या व आंकडेवार माहितीच्या पुस्तिकेंत केलेलें आढळेल.*

त्यावरून हें ध्यानांत येईल कीं, अंदाजपत्रकांतील मांडणी बदलली तरी त्यांतील खरी तूट करांच्या व भांडवली जमाखर्चाच्या एकंदर वजावटीवरून ठरवावी लागते. करांच्या अंदाजपत्रकाची तोंडमिळवणी करून भांडवली अंदाजपत्रकांत तूट असल्यास अंदाजपत्रक साकल्येंकरून तुटीचेंच असणार. तथापि, ही साधी गोष्ट आमच्या अर्थसचिवांच्या लक्षांत आलेली नाहीं असें दुर्दैवानें म्हणावें लागतें. खालील कोष्टकांत युद्धोत्तर काळांतील अंदाजपत्रकांत असलेली खरी तूट किती व कशी भरून काढण्यांत आली, हे दर्शविणारे आंकडे दिले आहेत. त्यावरून हा मुद्दा अधिक स्पष्ट होईल.

### चलनवृद्धीला पुष्टि

| | १९४६–४७ | १९४७–४८ (७½ महिने, १५ ऑगस्टपासून) |
|---|---|---|
| | कोटी रु. | कोटी रु. |
| करांच्या अंदाजपत्रकांतील तूट | ४५·२९ | ६·५२ |
| भांडवली अंदाजपत्रकांतील तूट | ६१·५२ | १३३·४१ |
| एकूण तूट | १०६·८१ | १३९·९३ |
| तूट भरून काढण्यासाठी | | |
| सरकारी शिलकेंतून घेतले | ८९·४५ | ९३·५५ |
| चलनीनोटा वाढवून घेतले | १९·६७ | ५१·०२ |
| एकंदर | १०९·८१ | १४४·५७ |

सरकारी शिलकींतून खर्च भागविणें व चलनविस्तार करणें यामुळें चलनवृद्धीला चांगलीच पुष्टी मिळते ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. यासाठीच सप्टेंबरमध्यें अर्थशास्त्रज्ञांनीं सरकारला केलेल्या सूचनांत या दोन्ही अंदाजपत्रकांची तोंडमिळविणी करण्याची सूचना केली गेली होती. या वर्षीच्या भांडवली अंदाजपत्रकांत रु. १८५·०९ कोटींची तूट आहे व ती वर उल्लेखिलेल्या उपायांनीच भरून काढण्यांत येईल यांत संशय नाहीं.

सालगुदस्तावरून पुढें चालू, या न्यायानें डॉ. मथाई यांनींही आपल्या भांडवली अंदाजपत्रकांत पुढील वर्षी १३४·१० कोटींची तूट येईल अशा अंदाज केला आहे. यावरून त्यांच्या अंदाजपत्रकांत, करांच्या अंदाजपत्रकांतील रु. ५५ लक्ष बाकी लक्षांत घेतां, रु. १३३·५५ कोटींची खरी तूट आहे. ही तूट भरून काढण्यासंबंधीं अगर तिच्या चलनवृद्धीवर होणाऱ्या परिणामाविषयीं डॉ. मथाई यांनीं एक चकार शब्दही कोठें काढलेला नाहीं. डॉ. मथाई सारख्या अर्थशास्त्रज्ञानें सुद्धा याचे परिणाम लक्षांत घेऊं नयेत हें आश्चर्याचें नव्हे काय? म्हणूनच, या लेखारंभीं उद्धृत केलेल्या सुभाषितांत म्हटल्याप्रमाणें परिस्थिति निर्माण होते. डॉ. मथाई यांनीं आपलें काम त्यांच्या लौकिकास व ज्ञानास शोभेल अशा रीतीनें पार पाडलेलें नाहीं, असें स्पष्ट म्हटलें पाहिजे. चलनवृद्धीला हें अंदाजपत्रक पुष्टिकारकच होईल.

---

† दूध व पाणी हीं वेगळीं करण्याचे कामीं, हे हंसा, तूच जर आळस केलास तर हल्लींच्या ह्या जगांत दुसरा कोण आपलें कुलव्रत पाळणार!

*"In the annual Financial Statement hitherto presented to the Legislature giving the Budget Estimates of the Central Government no attempt was made to give a picture of the Capital Budget. Statements A and B of the Financial Statement dealt with the Revenue and Expenditure Estimates, while Statement C enumerated the ways and means transactions of the Government in which are merged all transactions on capital account. With the growth of capital expenditure on postwar development the necessity for a proper presentation of the transactions of Government of a capital nature has become evident. This is an attempt to recast the form of the Budget so as to show separately the Revenue, Capital and ways and means transactions. The revised form in which the Budget Statement for 1946—47 has been prepared exhibits the estimates in three parts namely:—

(a) Statement of the Revenue receipts and expenditure;
(b) Statement of the Receipts and Disbursements on Captial Account and
(c) Statement of other receipts and disbursments.

The third statement incorporates the net surplus or deficit shown in the first two statements. There is no change in the information hitherto given. The change is only in the presentation of figures.

### १९४७–४८ मधील रेल्वे वहातुकीचा अहवाल

हिंदुस्थानची फाळणी झाल्यानंतरच्या पाहिल्या वर्षांत हिंदी रेल्वेनीं आपली कामगिरी कशी पार पाडली ह्याचें निवेदन १९४७-४८ सालच्या अहवालांत करण्यांत आलें आहे. ह्या सालीं घसारा, व्याज इत्यादि खर्च वजा जातां रेल्वेजना ७॥ कोटी निवळ तोटा आला. सर्व सरकारी रेल्वेचें एकूण उत्पन्न १८३·६९ कोटी रुपये झालें. त्यापैकी मालाच्या वहातुकीमुळें झालेलें उत्पन्न ८६·३३ कोटी रुपये होतें. उतारूंच्या प्रवासामुळें झालेलें उत्पन्न ७३·२५ कोटी रुपये होतें. एकूण उत्पन्नांत वरील दोन बाबींची टक्केवारी अनुक्रमें ४७ टक्के आणि ४० टक्के अशी पडते. बाकीचें उत्पन्न पार्सलें, लगेज इत्यादि बाबींपासून झालें.

एकूण १०४·४ कोटी उतारूंनीं प्रवास केला. प्रत्येक उतारूनें सरासरी ३२·२ मैल इतका प्रवास केला. वरील सर्व उतारूंनीं मिळून ३३६४ कोटी मैल प्रवास केला. मालाची वहातूक ७·३५ कोटी टन झाली. उतारूंची ने-आण करणाऱ्या गाड्यांचा प्रवास युद्धपूर्व काळापेक्षां ५॥ टक्के कमीच भरला. उतारूंमध्यें वरच्या वर्गानें प्रवास करण्याची प्रवृत्ति वाढलेली दिसून आली. १९३८-३९ सालीं तिसऱ्या वर्गानें प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा हिशेब एकूण प्रवाशांच्या हिशेबाच्या ९५ टक्के होता. १९४७–४८ सालीं ही टक्केवारी ९२ टक्के झालेली आढळून आली. वहातुकीच्या ने-आणींत ४५·९ टक्के वहातुक कोळशाची झाली. अन्नधान्य, डाळी आणि गळिताचीं धान्यें ह्यांची वहातुक ११·७ टक्के झाली. मार्च, १९४८ अखेर सर्व हिंदी रेल्वेंत मिळून ७४१·४० कोटी रुपये भांडवल गुंतलें होतें. त्यापैकी ६६७·४३ कोटी रुपये भांडवल हिंदी सरकारी रेल्वेचें होतें. उरलेलें ७३·९७ कोटी रुपये भांडवल हिंदी संस्थानें, कंपन्या, डिस्ट्रिक्ट बोर्डस् इत्यादींनीं घातलेलें होतें. हिंदी रेल्वेंत १९४७–४८ अखेर ८,२३,७१२ लोक कामावर होते. १९४६–४७ सालीं ही संख्या ७,७१,९९३ इतकी होती. संप आणि इतर दंगली ह्यांच्यामुळें कामाच्या एकूण दिवसांपैकीं २·२९ टक्के दिवस वाया गेले. वर्षअखेर रेल्वेच्या नोकरांसाठी ६४७ स्वस्त धान्याचीं दुकानें चालूं होतीं. शिधापत्रकें धारण करणाऱ्या नोकरांची संख्या ८,६३,००० होती आणि मालाच्या स्वरूपांत नोकरांना जी सवलत देण्यांत येत होती तिचेमुळें रेल्वेला २२·७९ कोटी रुपये तोटा सहन करावा लागला.

### "सह्याद्री"चें १९४८ मधील काम

सह्याद्रि विमा कंपनीकडे १९४८ सालीं ५६,३१,४५० रुपयांच्या विम्यासाठी ३,८०४ अर्ज आले. त्यांपैकी कंपनीनें ४७,५३,९५० रुपयांचें काम पुरें करून ३,१९० विमापत्रकें दिलीं.

**अफगाणिस्तान लाकूड पुरविणार**—पाकिस्तानांतील घरांचा तुटवडा भरून काढण्यासाठी मदत म्हणून अफगाणिस्थानच्या सरकारनें पाकिस्तानला इमारती लाकूड पुरविण्याचें कबूल केलें आहे. हें लाकूड अफगाणिस्तानांतील नद्यांमधून स्वालीं पाकिस्तानकडे प्रवाहांत सोडण्यांत येईल.

आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी
★ दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी ★
९६ नारायण पेठ, पुणें २.

### हिंदी संघराज्यांतील विजेचा खप

हिंदी संघराज्यांतील सार्वजनिक वीज-कंपन्यांनीं १९४७ सालीं ६१,००० किलोवॅटस् अधिक वीज निर्माण केली. १९४७ सालीं पाणीपुरवठा आणि वीज-बत्ती ह्यांच्यासाठी लागणाऱ्या विजेंत बरीच वाढ झाली असल्याचें आढळून आलें आहे. औद्योगिक उपयोगाकरितां वापरण्यांत येणाऱ्या विजेच्या पुरवठ्यांत मात्र फारशी वाढ झालेली नाहीं. विजेच्या निरनिराळ्या ग्राहकांना पुरविण्यांत येणाऱ्या विजेचा विचार करतां, उद्योगधंद्यांनीं इतर ग्राहकांच्या पेक्षां जवळ जवळ दुप्पट वीज वापरली असें दिसून येतें. वर्षांत एकूण ३३५·६ कोटी किलोवॅटस वीज विकण्यांत आली, त्यापैकीं, ६३·६ टक्के वीज उद्योगधंद्यांना पुरविण्यांत आली. वापराचा तपशील पुढीलप्रमाणें आहे. दिवाबत्ती, जळण आणि उबारा ह्यांच्यासाठी १७·९१ टक्के, विजेच्या साहाय्यानें चालणारी वहातूक ८·२५ टक्के, पाणीपुरवठा ५·०२ टक्के, पाटबंधारे ३·७३ टक्के, गांवांतील सार्वजनिक दिवे १·४९ टक्के. उद्योगधंद्यांत कापडाच्या गिरण्यांनीं लोखंड, पोलाद, ताग व सिमेंट ह्या सर्व धंद्यांच्यापेक्षा अधिक वीज वापरली. मुंबईमध्यें आणि पश्चिम बंगालमध्यें हिंदच्या इतर सर्व भागांपेक्षां अधिक वीज निर्माण होते. तथापि, दरडोई विजेची निर्मिती दिल्ली प्रांतांत अधिक झाली. मुंबई प्रांतांत १९४१ च्या खानेसुमारीप्रमाणें दरडोई ६५·६४ किलोवॅट वीज उत्पन्न झाली. दिल्ली प्रांतांत १००·२९ किलोवॅट उत्पन्न झाली. फाळणी झाल्यानंतर १ लाखावर लोकवस्ती असलेलीं ४९ शहरें अगर गांवें हिंदुस्थानांत राहिलीं. त्या सर्वांना विजेचा पुरवठा होत आहे. उलटपक्षीं, ५ हजारांपेक्षां कमी वस्ती असलेल्या ५,५९,७४६ खेड्यांपैकीं फक्त १,२९३ खेड्यांना विजेचा पुरवठा होतो. टक्केवारीच्या भाषेंत ०·३% इतक्या खेड्यांना विजेचा पुरवठा होतो.

### जमशेटजी टाटा जन्म दिनोत्सव

म. जमशेटजी टाटा ह्यांच्या जन्मदिनोत्सवानिमित्त लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय संस्थेच्या व्याख्यानशालेमध्यें श्री. भा. वि. धारपुरे यांनीं परदेश-प्रवासांत जमविलेल्या विविध साहित्यांचें प्रदर्शन दिनांक ३ मार्च १९४९ पासून सुरू झालें आहे. रविवार, ता. ६ मार्च १९४९ रोजीं एतन्निमित्त जाहीर समारंभ झाला. त्यावेळीं श्रीमंत सरदार आबासाहेब मुजुमदार ह्यांच्या अध्यक्षतेखालीं कांहीं उत्तमोत्तम वाद्यवादनांचा कार्यक्रम झाला. प्रदर्शन १५ दिवस उघडें राहील.

— सरस्वती मंदिर संस्थेचें —
पूना इंग्लिश स्कूल व पूना नाईट हायस्कूल
या दोन्हीं शाळांचे नवीन वर्ग १ मार्चपासून सुरू झाले. संस्थेनें या शाळांसाठीं नातू-बागेंत नुकतीच भव्य इमारत बांधली आहे. सर्व वर्गांतून मर्यादित प्रमाणांत विद्यार्थी घेणें आहेत. हुषार व गरीब विद्यार्थ्यांस फीत सवलत दिली जाते. अधिक माहिती-साठीं समक्ष भेटा--
—वेळा—
सकाळीं ९ ते ११ ★ रात्रीं ७॥ ते ८॥
—मुख्याध्यापक— —मुख्याध्यापक—
पूना इंग्लिश स्कूल ★ पूना नाईट हायस्कूल

### संरक्षित धंद्यांवर सतत लक्ष ठेवण्याचें अगत्य

हिंदुस्थान सरकारच्या व्यापार खात्यानें ता. ६ ऑगस्ट १९४८ रोजीं, हिंदी उद्योगधंद्यांना दिल्या जाणाऱ्या संरक्षणाबाबत एक महत्त्वाचा निर्णय जाहीर केला आहे. ज्या उद्योगधंद्यांना संरक्षण दिलें गेलें असेल त्यांच्यावर सतत लक्ष ठेवण्याचे अधिकार त्या अन्वयें टॅरिफ बोर्डाला देण्यांत आले आहेत. एखाद्या उद्योगधंद्याला टॅरिफ बोर्डाच्या शिफारसीप्रमाणें सरकारनें संरक्षण दिलें म्हणजे सरकारनें आपली कामगिरी बजावली अशी समजूत सामान्यतः प्रचलित आहे आणि ती कांहीं अंशीं बरोबर आहे; परंतु संरक्षित उद्योगधंद्यांचें भवितव्य अधिक सुरक्षित करण्याचे दृष्टीनें आजच्या परिस्थितींत एवढ्यावरच थांबणें इष्ट होणार नाहीं. अशा संरक्षित उद्योगधंद्यांच्या चढउतारावर लक्ष ठेवून, दिलेल्या मुदतींत कांहीं कमी-जास्त करण्याची जरूरी आहे किंवा काय यासंबंधींही विचार होणें आवश्यक होतें. वरील निर्णयान्वयें टॅरिफ बोर्डानें अशा प्रकारची सल्लामसलत सरकारला देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. टॅरीफ बोर्डाला हें काम कार्यक्षमतेनें करता यावें म्हणून, आणि जरूर त्या धंद्यांना अधिक संरक्षण अगर मदत देण्यास विलंब लागूं नये ह्यासाठीं ह्या निर्णयान्वयें संबंधित धंद्यांना बोर्डाकडे अर्ज करता येईल. ज्या उद्योगधंद्यांना प्रथम दिलेलें संरक्षण अपुरें वाटूं लागलें असेल त्यांनीं तसे अर्ज बोर्डाकडे करावयाचे आहेत. टॅरीफ बोर्डानें जरूर ती चौकशी करून आपल्या शिफारसी सरकारकडे पाठवावयाच्या आहेत. संरक्षित उद्योगधंद्यांसंबंधीं अशा प्रकारची तपासणी होऊन संरक्षणाचा फायदा-तोटा काय झाला ह्याविषयीं माहिती गोळा करणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें एखादा संरक्षित धंदा बुडूं लागण्याच्या पूर्वींच त्याला जरूर तर अधिक मदत देणें अगत्याचें असतें, त्या दृष्टीनें संबंधित उद्योगधंद्यांनीं वरील निर्णयाचा उपयोग करून घेणें त्यांच्या हिताचें आहे.

---

### मुं. प्रां. सहकारी बँक लि., किर्लोस्करवाडी शाखा

मुंबई प्रॉ. को. बँकेच्या किर्लोस्करवाडी शाखेशीं संलग्न असलेल्या सोसायट्यांची १९ वी वार्षिक साधारण सभा सोमवार ता. २४-१-४९ रोजीं किर्लोस्कर बंधूंचे नवीन बांधलेल्या इमारतींत श्री. सखारामदादा पाटील ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. सभेस सोसायट्यांचे प्रतिनिधी, निमंत्रित स्त्री-पुरुष, सातारा विभागाचे सि. इन्स्पेक्टर श्री. पुरोहित, विटे शाखेचे इन्स्पेक्टर श्री. ढंगे, तासगांव शाखेचे इन्स्पेक्टर श्री. सुर्वे, इत्यादि ७०/७५ मंडळी उपस्थित होती. त्याचप्रमाणें, किर्लोस्कर बंधु लि. तर्फे श्री. प्रभाकरपंत किर्लोस्कर व श्री. मंगेशराव रेगे, चीफ अकाउंटंट, हहीं हजर होते. मागील सभेचें प्रोसिडिंग वाचून झालेवर, श्री. झेंडे, शाखेचे एजंट, यांनीं किर्लोस्करवाडी शाखेचा ३०-६-४८ अखेरचा त्रोटक वृत्तांत व शाखा-कमिटीचा अहवाल वाचून दाखविला. नंतर सरकारी तपासनिसाची तपासणी-यादी व त्यावर बँकेनें दिलेलीं उत्तरें वाचून शाखेचे कामगिरीबद्दल समाधान व्यक्त करणेंत आलें. नंतर १९४९-५० सालची शाखा कमिटीची निवड जाहीर करणेंत आली व बजेट-मंजुरी ठराव पास करणेंत आला. सातवा महत्त्वाचा ठराव म्हणजे मुंबई सरकारकडून कांहीं कांहीं शेतकीचे उपकरणावर विक्री-कर घेणेंत येतो, तो माफ करणेत यावा यासंबंधींचा झाला व तो बँकेमार्फत मुंबई सरकारकडे पाठविणेचें ठरलें. श्री. झेंडे, एजंट यांनीं पाहुणे मंडळी व सभेचे अध्यक्षांचे आभार मानलेनंतर पान-सुपारी, अत्तरगुलाब व चहा-कॉफी होऊन समारंभ समाप्त झाला.


उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला

**ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.**

ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.

टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडीं, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तू; इत्यादींसाठीं चौकशी कराः—

**दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.**

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

तार : SAHYOG फोन : ३४५१९

**औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें**

(१) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज्
(लेः—जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ.)
(२) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन
(लेः—जे. बी. टेलर, किं. १ रु.)
(३) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन
(लेः—आर. एम. तळपदे, किं. १२ आ.)



दी

**बँक ऑफ कोल्हापूर, लि.**

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

*[कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली.]*

**स्थापनाः १९२९.**

मुख्य कचेरी :

सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

तार : BANKOP फोन : १८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,१६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | १,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :

(१) गुजरी (२) शाहुपुरी-कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई-फोर्ट-(१०) मुंबई-मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—
मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.

## रेल्वेजचें अंदाजपत्रक

( भा. म. का. )


रेल्वेजच्या अंदाजपत्रकांतील मुख्य आंकडे गेल्या अंकांत दिले आहेत. अंदाजपत्रकाचा विचार करतां पुढील गोष्टी स्पष्ट होतात. एका काळीं वॅगन्सचा तुटवडा हें रेल्वेच्या कमकुवत कारभाराचें मुख्य कारण समजलें जात असे. आतां इंजिनांच्या अपुरेपणावर विशेष भर दिला जात आहे. इंजिनें अपुरीं आहेत व रेल्वेमंत्र्यांच्या अपेक्षेप्रमाणें आणखी पांच वर्षांनीं हिंदमध्यें पुरेशीं इंजिनें तयार होऊं लागलीं म्हणजे रेल्वेच्या कारभारांतील एक प्रमुख अडचण निःसंशय दूर होईल. परंतु अपेक्षेप्रमाणें हें होईल तेव्हां खरें. रेल्वेच्या कारभारांतील मुख्य दोष म्हणजे मालवाहतुकीचे डबे, रिकामे करून, पुन्हा भरून वहातुकीला उपयोगी होणें यांत बराच कालावधी जातो. ह्या परिस्थितीला कारण रेल्वेचा नोकरवर्ग व अधिकारीवर्ग आहे. कार्यक्षमतेच्या दृष्टीनें वॅगन रिकामी करून पुन्हां भरली जाणें यांत शक्य तितका कमी वेळ गेला पाहिजे. रेल्वेच्या वहातुकीवर सध्यां जास्त ताण पडत आहे, या दृष्टीनेंहि वरील बाबतींत सुधारणा होणें आवश्यक आहे. ऐन युद्धकाळांत म्हणजे १९४५ सालीं दरमहा वाहातुकीसाठी भरल्या जाणाऱ्या वॅगन्सची संख्या आजपर्यंत सर्वांत जास्त म्हणजे ६ लक्ष, ५२ हजार होती. परंतु १९४८ सालीं भरल्या जाणाऱ्या वॅगन्सची संख्या जास्तींत जास्त मार्च महिन्यांत ४ लक्ष, ९२ हजार होती. इतर महिन्यांत हा आंकडा एकदां ४ लक्ष, ३६ हजार इतका खाली उतरला होता. गेल्या दोन वर्षांत, उत्पादनाच्या बिकट परिस्थितीला रेल्वेच्या वहातुकीचें अपुरें साधन हें एक महत्त्वाचें कारण समजलें जातें. उ. कच्च्या मालाच्या वहातुकीसाठी टिटाघर पेपर मिल्सला पुष्कळ अडचण सोसावी लागली. सिमेंट व रासायनिक धंदे यांनाहि वहातुकीच्या अडचणीला विशेष प्रकारें तोंड द्यावें लागलें.

पुढील वर्षी रेल्वेचें एकंदर उत्पन्न २१० कोटी रुपये होणार असून खर्चाचा अंदाज १५९ कोटी, ३ लक्ष रु. आहे. हे आकडे वरवर समाधानकारक दिसले तरी एकंदरींत हिंदच्या रेल्वेचें खर्चाचें प्रमाण फुगत चाललें आहे. १९४८-४९ सालीं खर्चाचें प्रमाण ७६ टक्के होतें, पुढील सालीं तें जवळ जवळ ७१ टक्के राहील. परंतु, युद्धकाळांत १९४२-४३ सालीं तें ५१·५२ टक्के इतकें कमी होतें. अर्थात् गेल्या सहा वर्षांतील वाढत्या महागाईच्या परिस्थितीचा हा परिणाम आहे. रेल्वेला उतारूंच्या वहातुकीपेक्षां मालाच्या वहातुकीपासून जास्त पैसा मिळत असल्यामुळें ( १९४८-४९ सालीं उतारूंच्या वहातुकीमुळें ८५ कोटी ४० लक्ष रुपये मिळतील, तर मालाच्या वहातुकीपासून ९७ कोटी, २६ लक्ष रुपये मिळतील. ) मालाच्या वहातुकीच्या बाबतींत शक्य तीं कार्यक्षमता निर्माण करणें आर्थिक दृष्ट्या रेल्वेला फायद्याचें ठरणार आहे. हिंदच्या रेल्वेजची भांडवली किंमत ६७८ कोटी रुपये असून त्यामानानें रेल्वे रिझर्व्ह फंडाची रक्कम अगदींच अपुरी आहे. चालू सालीं रेल्वेकडून हिंद सरकारकडे ७ कोटी, ३४ लक्ष रुपये जमा करण्यांत येतील व पुढील वर्षी ४ कोटी, ७२ लक्ष रुपये जमा करतां येतील असा अंदाज आहे.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें













## झेकोस्लोव्हाकिआंतील उत्पादन वाढीची योजना

सोव्हिएट रशिआचें अनुकरण करून झेकोस्लोव्हाकिआच्या सरकारनें औद्योगिक उत्पादनाच्या वाढीसाठी एक योजना आखली आहे. ह्या योजनेंत एक भाग असा आहे कीं, सरकारच्या चालकत्वाखाली असणाऱ्या कारखान्यांना कांहीं ठराविक रकम कामगारांच्या पगारासाठी म्हणून देण्यांत येईल. मात्र त्या कारखान्यांतील उत्पादन कांहीं विवक्षित पातळीपर्यंत वाढलेंच पाहिजे. तसें तें वाढलें नाहीं तर पगारफंडाची सर्व रकम त्या कारखान्याला न मिळतां त्यांतील कांहीं भागच मिळेल. ह्या पद्धतीमुळें कारखान्यांचे मॅनेजर्स तांत्रिक प्रगतीची अधिक काळजी घेतील, कामगार आणि मॅनेजर्स एकत्र बसून उक्त्या कामाचे योग्य ते दर ठरवितील, कामगारांची गैरहजर रहाण्याची प्रवृत्ति कमी होईल, इत्यादि अपेक्षा केल्या जात आहेत. समजा, एखाद्या कारखान्यानें पगार-फंडाचा पूर्ण हिस्सा न घेतां उत्पादन वाढविलें तर पगार-फंडाची उरलेली रकम कामगारांना वाटण्यांत येईल अगर त्या रकमेची इतर मार्गानें भरपाई करण्यांत येईल. ही पद्धत हळुहळु अमलांत आणली जात आहे. तथापि कामगार संघटनेला असें आढळून आलें कीं, पगार-फंडाच्या संघटनेच्या कांहीं अधिकाऱ्यांकडून दुरुपयोग करण्यांत येत आहे. त्यामुळें आतां असें ठरविण्यांत आलें आहे कीं कामगारांना अधिक उत्पादनाबद्दल जें बोनस देण्यांत येईल तें ट्रेड युनिअन कौन्सिलला द्यावें आणि कौन्सिलनें कामगार-हित-संवर्धक फंड म्हणून त्या रकमेचा विनियोग करावा. ह्या फंडपद्धतींत एक दोष असा आढळून आला कीं, उत्पादनापेक्षां पगारवाढ जास्त होते. उत्पादनाचा जानेवारी १९४७ मधील निर्देशांक १०० धरला तर १९४७ च्या दुसऱ्या तिमाहींत ११४·८ हा निर्देशांक आला. त्यावेळीं पगाराचा निर्देशांक १०६·८ असा होता. १९४८ च्या दुसऱ्या तिमाहींत उत्पादनाचा निर्देशांक १२०·७ इतका झाला; तथापि पगाराचा निर्देशांक मागील सालाच्या मानानें अधिक वाढला, तो ११३·८ इतका झाला. कांहीं उद्योगधंद्यांतून पगाराचा निर्देशांक उत्पादनाच्या निर्देशांकापेक्षा अधिक वाढला असें आढळून आलें. उत्पादनवाढीच्या नवीन योजनेमुळें कामगार आणि मॅनेजर दोघेही अधिक जबाबदारीनें कामें करतील असा सरकारचा अंदाज आहे. कारखान्यांच्या राष्ट्रीयीकरणानंतरही उत्पादन आणि वेतन ह्यांच्यांतील प्रमाण बिघडलें तर चलनवाढ झाल्याशिवाय रहात नाहीं, हें झेकोस्लोव्हाकिआच्या उदाहरणावरून दिसून येतें.

---

**जोग धरणापासून विजेचा पुरवठा**—जोग आणि हरिहर येथील वीज-केंद्रांतून मुंबई प्रांताला ११,५९० किलोवॅटस् वीज पुरविण्याबाबतच्या म्हैसूर सरकारशीं चाललेल्या वाटाघाटी यशस्वी झाल्या आहेत. तथापि, हुबळी आणि आपल्या प्रांतांतील इतर ठिकाणीं प्रत्यक्ष विजेचा पुरवठा होऊं लागण्यास तीन ते चार वर्षें लागतील, असें समजतें. त्यासाठी ९० ते १०० मैल लांबीच्या विजेच्या तारा घालणें आवश्यक आहे. दरम्यान, काळी नदीवरील धरणाच्या कामाची प्राथमिक तपासणी चालू आहे. हें धरण पुरें होण्यास ६ ते ८ वर्षें लागतील. धरणावरील वीज-केंद्रांतून ३,५०,००० किलोवॅटस् विजेचा पुरवठा होऊं शकेल.

**नॉर्वे–डेन्मार्कसाठी जपानी बोटी**—नॉर्वे आणि डेन्मार्क ह्या दोन देशांसाठी ८० लाख डॉलर्स किंमतीच्या बोटी बांधण्याचें काम जपानी बोट बांधणाऱ्या कंपन्यांनीं करार करून आपणाकडे घेतलें आहे. वास्तविक नॉर्वे हा देश स्वतः बोटी बांधूं शकतो.

## ग्रेट ब्रिटनची १९४८ सालची प्रगति

१९४७ च्या मानानें १९४८ सालीं ब्रिटनचें औद्योगिक उत्पादन २० टक्क्यांनीं वाढलें. पोलादाच्या उत्पादनांत १९४८ सालीं पूर्वीच्या वर्षाच्या मानानें १७ टक्के वाढ झाली. वार्षिक उत्पादन १ कोटी ४७ लक्ष टन होईल असा अंदाज आहे. कोळशाच्या उत्पादनांत पूर्वीच्या वर्षाच्या मानानें ६ टक्के वाढ झाली. कोळशाची निर्यात व्हावयासहि सुरवात झाली. १९५२ अखेर पर्यंतच्या पांच वर्षांत शेतीचें उत्पन्न ५० टक्के वाढवावयाचें अशी योजना आहे व १९४८ चें उत्पन्न युद्धापूर्वीच्या उत्पन्नाच्या २५ टक्के जास्त होतें. घरें बांधण्याच्या कार्यक्रमांत एका वर्षांत ५० टक्के प्रगति झाली. दरमहा १८,००० ह्या प्रमाणांत नवीन घरें बांधली गेलीं. ग्रेट ब्रिटनची पुष्कळशी मदार जहाजें बांधणें, विजेचें सामान तयार करणें व यंत्रसामुग्रीची निर्मिति ह्यांवर साधारणतः असते. ह्या तीनहि महत्त्वाच्या धंद्यांत एका वर्षांत २४ टक्के वाढ झालेली दिसते. मोटार गाड्यांचें बांधकाम फार वेगानें चालू असून अकरा महिन्यांत ३ लक्ष, ६ हजार गाड्या बांधल्या गेल्या, व ह्यांपैकीं ७५ टक्के गाड्या निर्गतीसाठी उपयोगांत आल्या. ट्रॅक्टर्सची निपज तर पूर्वीच्या वर्षांच्या मानानें चौपटीनें वाढली. लोकर व कापड ह्यांचेंहि उत्पादन वाढलें. युद्धोत्तर काळांत ब्रिटनची सर्व मदार निर्गतीचा उच्चांक गांठण्यावर होती व ह्या दृष्टीनें निर्यातीचा योग्य तो आंकडा गांठण्यांत आला आहे असें दिसतें. आर्थिक परिस्थिति निश्चितपणें सुधारण्यासाठीं आयातहि शक्य तितकी म्हणजे युद्धपूर्वीच्या मानानें २० टक्क्यांनीं कमी करण्यांत आली आहे. एका वर्षांत जागतिक किंमतींत शेकडा ११ टक्के वाढ झाल्यामुळें प्रत्यक्ष परिणामाच्या दृष्टीनें आयात मालाच्या किंमती वाढून, वाढत्या निर्यातीचा परिणाम जितका दिसावा तितका स्पष्ट दिसूं शकला नाहीं. तरीपण, परराष्ट्रीय व्यापाराला प्रगतीच्या दृष्टीनें इष्ट वळण निश्चित लागलेलें दिसतें. महागाईविरुद्ध मोहिमेमुळें एका वर्षांत राहाणीच्या निदर्शक आंकड्यांत फक्त चार टक्क्यांच्या आंतच वाढ झाली.

---

### पूना गेस्ट हाऊस लि.

पूना गेस्ट हाऊसचें वरील खासगी लिमिटेड कंपनींत रूपांतर झालें आहे. मे. सरपोतदार बंधूंचेकडे मॅनेजिंग एजन्सी आहे.

---

**बिहारमधील विजेचे कारखाने**—बिहार प्रांतांतील वीज निर्मितीच्या कारखान्यांचें राष्ट्रीयीकरण करण्याच्या मार्गांतील पहिलें पाऊल म्हणून बिहार सरकारनें वीज निर्माण करूं इच्छिणाऱ्या चार खाजगी भांडवलाच्या कंपन्यांना परवाने देण्याचें नाकारलें आहे. ह्या चारहि ठिकाणीं सरकार स्वतःच वीज निर्माण करणार आहे असें समजतें.

**कोचीन संस्थानामधील जमिनीची पहाणी**—कोचीन संस्थानच्या हद्दींतील कांहीं भागाची शेतीच्या दृष्टीनें पहाणी करण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें आपला एक तज्ज्ञ भूगर्भशास्त्रज्ञ संस्थान सरकारच्या दिमतीला देण्याचें कबूल केलें आहे.

**कानडाची निर्यात वाढली**—ह्या वर्षीं कानडा देशांतून हिंदुस्थानांत आणि पाकिस्तानांत येणाऱ्या मालाची बऱ्याच प्रमाणांत वाढ झाली असल्याचें त्या देशाकडून जाहीर झालें आहे.

**पश्चिम बंगालमधील सुंदरबन**—पश्चिम बंगालमधील सुंदरबन भागाचा आर्थिक दृष्ट्या काय उपयोग करून घेतां येण्यासारखा आहे, हें पहाण्यासाठी प्रांतिक सरकारनें एक कमिटी नेमली आहे. ह्या भागाचा शास्त्रीय दृष्टीनें योग्य उपयोग करण्यांत आला तर प्रांताच्या अन्नधान्यांचा आणि निर्वासितांचा प्रश्न हे दोन्ही सुटण्यास मदत होईल.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५१। आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.